# <u>नियमीत दिवाणी दावा क्र. ८/२०२६ नि. २१ खालील आदेश</u>

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्रमांक २ व ३ विरुध्द झालेला एकतर्फा चौकशीचा आदेश रद्द होवून प्रतिवादीस कैफियत दाखल करण्याची परवानगी देण्यात यावी.

२. प्रस्तुत अर्जाचे कामी प्रतिवादी यांचे कथन असे की, प्रतिवादी क्रमांक ३ यांनी प्रतिवादी क्रमांक २ यांना समन्स व नोटीसची माहिती दिली नसल्याने त्यांना हया कामी हजर राहून कैफीयत दाखल करता आली नाही. म्हणून त्यांचे विरुध्द एकतर्फा असा आदेश पारित करण्यात आला. प्रतिवादी क्रमांक २ व ३ यांनी निशाणी १८ लगत त्यांच्याविरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द होवून मिळण्यासाठी विनंती केली आहे. अशा परिस्थीतीत दाव्याचा अंतिम निर्णय होण्याच्या दृष्टीने प्रतिवादींना कैफियत दाखल करण्याची संधी देणे नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने आवश्यक व गरजेचे आहे. तरी अर्ज मंजुर करावा अशी विनंती केली आहे.

३. वादी यांनी अर्ज मंजूर करण्यास आक्षेप घेतला. वादीचे विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, प्रतिवादी यांना पुरेशी संधी देवूनही ते वेळेत हजर झाले नाहीत. अर्जात नमुद कारण योग्य नाही तरी, अर्ज नामंजुर करावा.

४. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला. प्रस्तुत अर्जाचे, अभिलेखावरील कागदपत्रांचे व विधीज्ञांच्या युक्तीवादाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दिनांक ०७/०२/२०२६ रोजी प्रतिवादी यांना समन्स व नोटीसची बजावणी झालेली आहे परंतू, ते हया कामी हजर झाले नाही. म्हणून त्यांचे विरुध्द एकतर्फा आदेश पारित करण्यात आला. परंतू, दाव्याचा अंतिम निर्णय होण्याच्या दृष्टीने प्रतिवादीला कैफियत दाखल करुन आपली बाजू मांडण्याची संधी देणे नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने गरजेचे व आवश्यक आहे. परंतू, प्रतिवादी यांनी अर्ज दाखल करण्यास झालेला विलंब लक्षात घेता, सदरहू अर्ज खर्चावर मंजूर करणे योग्य होईल. सबब, पुढील आदेश –

## <u>आ दे श</u>

प्रतिवादी याचे विरुध्द झालेला एकतर्फा चौकशीचा आदेश रद्द होवून प्रतिवादीस कैफियत दाखल करण्याची परवानगी खर्च रक्कम रुपये २००/– (अक्षरी रुपये दोनशे मात्र) वादीला देण्याच्या अटीवर रद्द करण्यात येतो.

MANOJ CHANDRAKANT NEPTE
Digitally signed by MANOJ CHANDRAKANT NEPTE
Date: 2026.06.30 13:41:02 +0530

शहादा
दि.३०/०६/२०२६

(**मनोज चं. नेपते**)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, शहादा,
जि. नंदुरबार

## CERTIFICATE

I hereby certify that the contents of this PDF file are word to word as per the original order

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | :- | Nilesh B. Bhamare |
| Name of the Court | :- | Civil Court, Senior Division, Shahada |
| Date of announcement of order | :- | 18/06/2026 |
| Date of signing of order | :- | 18/06/2026 |
| Date of uploading PDF File | :- | 18/06/2026 |